


## अग्निशमन दल दिनाच्या दिवशीच अमळनेर तालुक्यात चार ठिकाणी आग

■ अमळनेर। प्रतिनिधी–

अग्निशमन दल दिनाच्या दिवशीच तालुक्यात चार ठिकाणी एका पाठोपाठ आग लागल्याने कर्मचाऱ्यांच्या कसबला कस लागला होता. शर्थीचे प्रयत्न करून अग्निशमन दलाने वेळीच आग विझवल्याने पुढील अनर्थ टळले आहेत.

तालुक्यातील धार रस्त्यावरील भटू भिका पाटील यांच्या शेतात दि. १४ रोजी दुपारी १ वाजता आग लागली. मुख्याधिकारी तुषार नेरकर यांना माहिती मिळताच त्यांनी अग्निशमन दल प्रमुख गणेश गोसावी यांना ताबडतोब बंब पाठवण्याचे आदेश दिले. अग्निशमन दलाचा बंब पोहचताच चारही बाजूने आग नियंत्रणात आणून गहू वाचवण्यात यश मिळवले. ही आग विझवली जात नाही तोच शहरातील केशवनगर भागात आग लागली. पालिकेचा दुसरा बंब पाठवण्यात आला. केशवनगरमध्ये झाडांना आग लागली होती. लागूनच घरे होती आणि हवेमुळे आग पसरण्याची शक्यता होती. दलाच्या कर्मचाऱ्यानी तातडीने आग विझवली. तेथून परत येत नाही तोपर्यंत पावणे तीन वाजेच्या सुमारास तालुक्यातील दहिवद येथे विलास बिरारी यांच्या शेतात आग लागली. गाड्या भरून धावपळ करत अग्निशमन दल पोहचले आणि वेळीच आग आटोक्यात आणून शेतकऱ्याचा मका वाचवला. ही आग विझवली जात नाही तोपर्यंत तालुक्यातील रणाईचे येथे शेतात आग लागल्याने खळ्यातील झाडे, चारा आदी साहित्य जळाले. अग्निशमन अधिकारी गणेश गोसावी, दिनेश बिऱ्हाडे, फारुख शेख, जाफर पठाण, आनन्दा झिम्बल, मच्छीन्द्र चौधरी, आकाश बाविस्कर यांनी चारही ठिकाणी आग विझवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले.

## चोपड्याच्या पंकज बालसंस्कार केंद्रात वार्षिक गुणगौरव समारंभ उत्साहात

■ चोपडा। प्रतिनिधी–

येथील पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या पंकज बालसंस्कार केंद्रात बालकांना प्रेरणा देणारा वार्षिक गुणगौरव समारंभ नुकताच उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी पंकज प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.व्ही.पाटील होते. बालकांनी वर्षभरात आयोजित विविध नावीन्यपूर्ण उपक्रमात सहभागी होऊन आपले कौशल्य दाखविले. त्याबद्दल गुणवंत विद्यार्थी व पालकांचा प्रशस्ती पत्र देऊन गुणगौरव करण्यात आला. यावेळी विद्यालयातील प्राथमिक उपशिक्षक योगेश चौधरी यांची अखिल भारतीय गांधर्व संगीत महाविद्यालय मुंबई संस्थेच्या सल्लागारपदी निवडी झाल्याबद्दल त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून चंद्रहास पाटील, दिगंबर धनगर, राजेश वाघ, चारुलता चौधरी, सुनिता राठोड, प्रियंका राजपूत उपस्थित होते. प्रास्तविक विभाग प्रमुख मिना माळी यांनी केले. यावेळी एम.व्ही.पाटील यांनी पालकांना मार्गदर्शन करून गुणवंत विद्यार्थ्यांसह शिक्षिकांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भावना दिक्षीत, संध्या पाटील, जयश्री हिंगे, योगिता कोळी, अनिता बऱ्हाटे, सुनंदा विसावे, जयश्री महाजन या शिक्षिका तसेच विजय सोनवणे, ज्योती महाजन, पूनम चौधरी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन छाया बारी यांनी केले.

## निधन वार्ता

### महेंद्रसिंह राऊळ

■ शिंदखेडा । वार्ताहर



शिंदखेडा येथील अँग्लो उर्दू विद्यालयातील सेवानिवृत्त मुख्याध्यापक महेंद्रसिंग जतनसिंग राऊळ (वय ६३) यांचे दि.१५ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि.१६ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता नगरपंचायत चौक शिंदखेडा राहत्या घरापासून निघणार आहे त्याच्या पश्चात मुलगा, मुलगी,पत्नी, पुतणे असा परिवार आहे. ते एसएसव्हीपीएस ज्यू कॉलेजचे प्राचार्य सुवर्णसिंग राजपूत यांचे मोठे काका होत.



### आनंदा शिंपी

■ निजामपूर । वार्ताहर

साक्री तालुक्यातील जैताणे येथील रहिवासी आनंदा शंकर शिंपी(वय ८६) यांचे दि.१४ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुल,सुना, मुलगी नातवंडे असा परिवार आहे.ते शिंपी समाजाचे कार्यकर्ते दगा शिंपी ,भैय्या शिंपी यांचे वडिल तर वेडू शिंपी यांचे बंधु होत.

जाहिरात छोटी किमया मोठी

जाहिरात छोटी किमया मोठी

### नशिबाची परीक्षा

बुधवार १६/०४/२०२५

* मिलन डे *

१४५ ३३० २४४ — २-५ — ९०० २६० १६० | सिंगल ०-१-३

जोड ९०-९१-१२-३५-४२

* कल्याण बाजार *

७७६ २७० ३५४ — ०-४ — १२२ ९५० ७७० | सिंगल १-६-५

जोड २२-२५-१९-५६-८९

* मुंबई (मेन) बाजार *

४२३ १७९ ८५६ — ८-५ — १४० २३० ७८० | सिंगल ९-६-३

जोड ५३-८७-५८-६२-००

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

## पान १ वरुन ...

### सफाई कशाची ?

प्लास्टिक एक महत्त्वाचे कारण आहे. वास्तविक एकदा वापरुन फेकून दिल्या जाणाऱ्या प्लास्टिक वापरावर बंदी आहे. तरीही त्याचा वापर आढळतो. लोकही मागचा पुढचा विचार न करता अशा वस्तू इतस्ततः फेकतात. वाट्टेल तिथे कचरा टाकून कचऱ्याचे 'ब्लॅक स्पॉट' तयार करतात. पावसाच्या पाण्याबरोबर हेच प्लास्टिक नदीपात्रात जाते. नाल्यांमध्ये जाऊन बसते. परिणामी नाले वारंवार तुंबतात. पावसाळ्यात तर परिस्थिती अजूनच गंभीर बनते. तेच घाण पाणी लोकांच्या घरातदेखील शिरते. वातावरणात दुर्गंधी सुटते. साथीचे रोग बळावतात. लोकांचे आरोग्य धोक्यात येते आणि नाले लोकांमुळेदेखील तुंबतात अशी सबब पुढे करुन प्रशासनाला सुटका करुन घेता येऊ शकते. पावसाळा येऊ घातलाय. यंदा यापेक्षा वेगळी स्थिती लोकांना अनुभवास येईल का? की यंदाही नालेसफाईची रडकथा मागच्या पानावरुन पुढे सुरु राहील आणि शहरे घाण पाण्यात बुडतच राहातील?

### पुण्यातील उद्योगपतीचा सायबर मर्डर

त्यामुळे त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणात तीन ते चार आरोपी असल्याचे माहिती पोलिसांकडून मिळत आहे.

दरम्यान, उद्योगपती घरी परतले नसल्याने कोथरूड पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्या कुटुंबीयांनी लक्ष्मण शिंदे हे बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. यानंतर पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. पाटण्यात उद्योगपती शिंदे यांचा मृतदेह आढळून आला आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध घेतला जात आहे. तर कोथरूडमधील उद्योगपतीचा मसायबर मर्डरफ झाल्याने पुण्यात एकच खळबळ उडाली आहे

### नगराध्यक्षांना हटविण्याचे अधिकार नगरसेवकांना

येईल. या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांना १० दिवसांच्या आता विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल. अधिनियमातील सुधारणाविषयक विधेयक राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

यापूर्वी नगराध्यक्षांना पदावरुन बाजूला सारण्याचा प्रक्रियेत निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी ५० टक्के नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर राज्य सरकारच्या स्तरावर कार्यवाही करून नगराध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कारवाई केली जात होती. आता राज्य सरकारने आपले अधिकार सध्या अस्तित्वात असलेल्या १०५ नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरीच्या लोकनियुक्त नगरसेवकांना दिले आहेत. या १०५ स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत येत्या दोन वर्षात संपत आहे.

## उष्मालाटेच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे- जिल्हाधिकारी

■ धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्याचे तापमान दिवसेंदिवस वाढत असून उष्मालाटेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी सज्ज रहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिले.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातर्फे सर्व संबंधित विभाग प्रमुखांची उष्मालाट व्यवस्थापन संदर्भात पूर्वतयारी बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. यावेळी जिल्हाधिकारी श्री. पापळकर बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील, पोलीस उपअधीक्षक विश्वजीत जाधव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. पापळकर म्हणाले, आरोग्य विभागाने प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात व रुग्णालयामध्ये कुलवार्ड तयार करावे. रुग्णालयांमध्ये उष्णतेच्या लाटेमुळे आजारी पडलेल्या लोकांसाठी खाटांची उपलब्धता करावी, पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवावा.

प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना चांगले उपचार देण्यात यावे. ज्या लोकांना घरात उष्णतेपासून बचाव करण्यासाठी सोय नाही, त्यांच्यासाठी तात्पुरती निवारा केंद्रे उभारावे. उष्णतेच्या लाटेमुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत पोहोचवण्यासाठी पथके तयार ठेवावीत. बाजार, प्रमुख कार्यालये, बस स्टँड, टॅक्सी स्टॅंड, रिक्षा स्टँड इत्यादी सार्वजनिक ठिकाणी पुरेशी सावलीची व्यवस्था करावी तसेच सदर ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करावी, (पंखा,कुलर इ. नादुरुस्त असल्यास दुरुस्त करावे) सार्वजनिक ठिकाणी उष्णतेच्या लाटेशी संबंधित घ्यावयाची काळजी, संदर्भात पोस्टर्स,बॅनर्स लावावेत. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी प्रथमोपचार पेट्या ठेवाव्यात आणि त्याच्या वापराबाबत आवश्यक सूचना लिहाव्यात. सार्वजनिक वाहतुकीच्या सेवा सुरळीत राहील आणि प्रतीक्षा क्षेत्रावर सावली, पाणी आणि पंखे याची सोय करावी. बस स्थानकावर पाण्याची सोय, पंखे सुस्थितीत असावे. उष्णतेच्या लाटेमुळे आरोग्यविषयी गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी नागरिकांनी जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. पापळकर यांनी केले.

## धुळे जिल्ह्यात दोन ग्रामसेवकांना आदर्श ग्रा.पं. अधिकारी पुरस्कार

■ धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्यातून दोन ग्रामसेवकांना महाराष्ट्र शासनाकडून आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे.

जिल्हा परिषद स्तरावर उत्कृष्ठ काम करणाऱ्या ग्रामसेवकांना शासन स्तरावरुन यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार देण्यात येतो.

सन २०२२-२३ चा कर्ले (ता.शिंदखेडा) ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका भारती भास्कर गवळी यांना तर २०२३-२४ चा चौगाव (ता.धुळे) ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक विजय साहेबराव सैंदाणे यांना जाहीर झाला आहे.

## राज्य तलवारबाजी स्पर्धेत धुळे जिल्ह्याचे वर्चस्व




■ धुळे । प्रतिनिधी

शिरपूर : नुकत्याच नाशिक येथे संपन्न झालेल्या नवव्या मिशन राज्यस्तरीय १२ व १४ वर्ष खालील मुले व मुली स्पर्धेत विविध जिल्हयातून १७० खेळाडू सहभागी झाले होते. त्यात धुळे जिल्ह्यातील खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत पदकांची लयलुट केली.

आयुष प्रणव पाटील याने ऐपे प्रकारात सिल्वर मेडल व फाईल प्रकारात ब्रांझ मेडल पटकावले. गिरीराज अमरदीप पाटील याने फॉईल प्रकारात सिल्वर मेडल व ऐपे प्रकारात ब्राझ मेडल, पार्थ उमेश ठाकरे याने ऐपी व फॉईल प्रकारात ब्रांझ मेडल, भावेश अमरदीप पाटील याने सॅबर व फॉईल प्रकारात ब्राँझ मेडल तसेच मुलींमध्ये यशिता प्रशांत शिंदे हिला ऐपे प्रकारात सिल्वर मेडल व फॉईल प्रकरात ब्रांझ मेडल, श्रेया नितिन जाधव हिने ऐपे व फॉईल प्रकारात ब्राँझ मेडल प्राप्त केले. एनआयएएस धुळे जिल्हा प्रशिक्षक विशालराव (कोलकाता), ओम मनोज धनगर यांचे मार्गदर्शन लाभले.

विजयी खेळाडूंना तलवारबाजी संघटनेचे सचिव राज्य सदस्य कैलास कंखरे यांचे सहकार्य लाभले. विजयी खेळाडूंना बक्षिस वितरण करण्यात आले.

विजयी खेळाडूंना धुळे जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, एम.के. पाटील, रेखा पाटील, योगेश देवरे, धुळे जिल्हा अध्यक्ष सतिश महाले, उपाध्यक्ष मनोज धनगर, सचिव कैलास कंखरे, खजिनदार प्रशांत धनगर, शितल केडमी, सोनगीरचे सागर पटेल, मयुर माळी, प्रणव पाटील यांनी केले.

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २४-०२-२०२५ ०१-०३-२०२५ | ४४७ ५७ २६९ | ३६७ ६५ २६७ | १३६ ०६ ४५७ | १८० ९७ १७९ | २७० ९३ ३३७ | ६९० ५३ १२० |
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | ७७८ २१ ५८८ | ४६० ०१ ६६९ | ५५८ ८० ६७७ | ३०० ३९ २८९ | १२९ २० ४६० | ३७० ०१ १२८ |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | ७८९ ४९ ५६८ | १२५ ८९ ४६९ | ३६९ ८३ १५७ | १५६ २९ १८० | ● | १३० ४४ ७८९ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | ५५८ ८२ ७७८ | २४४ ०१ २९० | ५७९ १४ ३४७ | १२० ३३ ७८८ | १६० ७० ६७७ | ८८० ६६ २७७ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १११ ३३ १३९ | ६७७ ०० ३३४ | ४७० १० ५५० | ८९० ७९ २८९ | २५७ ३४ १५५ | २३४ ९६ ५५६ |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | १२८ १२ ३३६ | ४६० ०४ ३५६ | ८८० ६६ ३६७ | १७८ ६१ ५६० | १६९ ६२ १३८ | २३५ ०२ ६७९ |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | १८० ९१ ५८८ | २४७ ३६ २६८ | ७८९ ४४ २३९ | २७७ ६३ ६७० | ३४५ २३ २३८ | ४६९ ९३ ६८९ |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | २५७ ४० ३८९ | २७० ९६ २६८ | | | | |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४-०२-२०२५ ०१-०३-२०२५ | २६६ ४७ ४५८ | ३५९ ७५ ४५६ | ६९० ५० ३८९ | २६७ ५९ ४६९ | ५६९ ०७ ३५९ | ३४० ७८ २६० | ● |
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | २४७ ३७ ६६८ | ११५ ७८ ४६८ | १३५ ९६ १२३ | २३० ५२ १५६ | ५७८ ०२ २३७ | २६० ८१ ४७० | ● |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | २३९ ४४ २४८ | ६७८ १३ १४८ | ३४५ २९ १४४ | ७७० ४२ २५५ | ● | १४९ ४७ २७८ | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १२० ३६ ११४ | ५७९ १२ ५८९ | ३८८ ९५ १७७ | १३८ २८ ४७७ | ३५९ ७९ १२६ | ५८८ १३ ६७० | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १३८ २८ २६० | ७८८ ३७ २५० | ३४६ ३८ १७० | १६० ७१ ३८० | १४८ ३४ ३५६ | १४५ ०३ ६७० | ● |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | ४५५ ४५ १५९ | ६७० ३६ ३६७ | २३६ १९ ४६९ | ६८८ २६ ४४८ | ८८९ ५४ ३५६ | १२० ३४ ५९० | ● |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | ३६६ ५१ २९० | २४७ ३१ ११९ | १५० ६१ ४८९ | १४९ ४० ४७९ | ४४६ ४२ ११० | १६९ ६६ ११४ | ● |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | ६६७ ९७ ३७७ | १८० ९२ २४६ | | | | | ● |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| ३७० ०५ ४४७ | ३५८ ६३ २३८ | ५५६ ६५ २३० | २५० ७९ २७० | ३८८ ९४ ६९९ | ११८ ०३ २३८ |
| १२६ ९५ ४५६ | १२४ ७० २४४ | ३३० ६७ ८९० | ५७८ ०९ ३७९ | २३७ २६ ६०० | ३६९ ८९ ५६८ |
| ४६७ ७८ ४५९ | ४५८ ७८ ४७७ | ३७९ ९३ ३४६ | ३४९ ६९ ३७९ | ● | ४९० ३१ १४६ |
| ४६७ ७७ २६९ | ११३ ५१ ३८० | ५५८ ८२ १५६ | ४४० ८९ २७० | ४५६ ५५ ४५६ | १२५ ८५ १६८ |
| २९९ ०२ ३४५ | १९९ ९० ३७० | ११२ ४६ ३४९ | १३८ २१ ५६० | ३४५ २३ १३९ | ११६ ८८ ३५० |
| २४७ ३७ १७९ | ६९० ५१ १३७ | ३३७ ३३ २४७ | १२० ३७ ४४९ | २०० २३ २४७ | २६० ८४ २३९ |
| २८० ०९ २३४ | ८८० ६५ ६९० | ४५७ ६१ ३८० | १२९ २५ ६९० | ८८० ६४ १५८ | ५९० ४५ १७७ |
| ३६९ ८० ३३४ | | | | | |

## क्लासिफाईड

सोमवार १४/०४/२०२५

मेन बाजार -७७९-३८-३५०

मिलन ना.-३६९-८०-३३४

मंगळवार १५/०४/२०२५

मेन बाजार -

कल्याण-२७०-९६-२६८

मिलन डे -१८०-९२-२४६

मिलन ना.-

### पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२१९ दि.२९/३/२५)

### खरेदी विक्री

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाड्याने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२१९ दि.२९/३/२५)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

### १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www.drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही. एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

### उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

### देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

### सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.